ISSN 2278-6864

# शिक्षण आणि समाज

विशेषांक, जुलै २०१५ ते डिसेंबर २०१७

'सामाजिक विकासातून शिक्षण आणि शिक्षणाद्वारा सामाजिक विकास'
ह्या धोरणास वाहिलेले त्रैमासिक

M.M. chole



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि एकविसावे शतक

इंडिअन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन
जे. पी. नाईक पथ, कोथरूड, पुणे- ४११ ०३८

# शिक्षण आणि समाज

विशेषांक, जुलै २०१५ ते डिसेंबर २०१७

'सामाजिक विकासातून शिक्षण आणि शिक्षणाद्वारा सामाजिक विकास'
ह्या धोरणास वाहिलेले त्रैमासिक

**अध्यक्षीय मनोगत**
भालचंद्र मुणगेकर .................... ०३

**संपादकीय**
सुनिलकुमार लवटे .................... ०४

**लोकशाही यशस्वी करण्यासाठी पूर्वावर्ती शर्ती**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर .................... ०८

**संसदीय लोकशाही आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
प्रकाश पवार .................... २०

**कष्टकऱ्यांचे सक्षमीकरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
धनंजय लोखंडे व सुनील दाभाडे .................... २९

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जातिअंतासंदर्भातील विचार**
संजयकुमार कांबळे .................... ३४

**लोकशाहीवरील संकट आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
देवकुमार अहिरे .................... ४५

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीवादी विचार**
दीपाली क्षीरसागर .................... ५२

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन**
रीना कांबळे .................... ५७

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार**
ईश्वर ल. राठोड ........................................................................ ६१

**भटक्या जमाती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
जगन्नाथ बा. सावंत ..................................................................... ६७

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर - छोटे राज्य व संविधान**
माधव चोले .............................................................................. ७९

**आरक्षण : अपेक्षा आणि वास्तव**
दीपक प्र. गायकवाड ..................................................................... ८८

***

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर-छोटे राज्य व संविधान

माधव चोले

स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या राज्यातून छोट्या राज्यांच्या मागण्या कमी अधिक प्रमाणात चळवळींच्या व हिंसात्मक आंदोलनांच्या माध्यमातून पुढे येत आहेत. त्या भाषिक अलगता, सांस्कृतिक वेगळेपणा, प्रादेशिक अस्मिता आणि सामाजिक व आर्थिक मागासलेपणाच्या कारणांनी करण्यात आलेल्या आहेत. निवडणुकीच्या तोंडावर उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्री मायावती यांनी उत्तरप्रदेशाचे चार राज्यांत विभाजन करण्याचा ठराव विधानसभेत मंजूर करून घेतला आणि छोट्या राज्यांचा मुद्दा पुन्हा चर्चेला आला. फेब्रुवारी २०१३ मध्ये नागपूरच्या भव्य सभेत परत मायावतींनी विदर्भ राज्याची मागणी पूर्ण करू असे सूचित केले. अगोदरच आंध्रप्रदेशातून स्वतंत्र तेलंगणा राज्यासाठी तीव्र आंदोलने होत होती. तेलंगणाची प्रेरणा घेऊन स्वतंत्र विदर्भातील ही मागणी महाराष्ट्रात जोर धरू शकते.

तसेच भारतातील मोठ्या राज्यांतून छोट्या राज्यांच्या मागण्या सातत्याने येत आहेत. त्यात पश्चिम बंगालमधून गोरखा लँड, आसाममधून बोडोलँड, ओरिसातून कोशलांचल, कर्नाटकातून कूर्ग, उत्तर बिहार, उत्तर प्रदेशांचा काही भाग आणि पश्चिम बंगाल काही भाग मिळून मिथिलांचल अशा मागण्या होत आहेत. या पार्श्वभूमीवर संविधानात राज्य निर्मितीचे उपबंध काय आहेत, आंबेडकरांचे त्यावेळचे छोट्या राज्यासंबंधीचे विचार, त्यावेळची पूर्ण राजकीय परिस्थिती, नेतृत्व, पक्ष पद्धतीचे स्वरूप अशा परिस्थितीत छोटी छोटी राज्ये निर्माण केली तर काय झाले असते, कोणते राजकीय बदल झाले असते, आजच्या स्थितीत आंबेडकरांचे छोट्या राज्यासंबंधीचे विचार, आजची बदलती राजकीय परिस्थिती, अशा परिस्थितीत आंबेडकरांच्या विचारावर आधारित छोटे राज्य निर्माण केले तर कोणत्या राजकीय अडचणी येऊ शकतील तसेच आजच्या आघाड्यांच्या राजकारणात अशी छोटी राज्ये निर्माण करताना पक्षीय राजकारणाचे मतभेद काय असतील याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## राज्य निर्मितीचे संविधानात्मक उपबंध :

संविधानानुसार राज्याच्या प्रचलित व्यवस्थेत व रचनेत बदल घडवून

आणण्याचे अधिकार संसदेला आहेत. संसद कलम- ३ नुसार नवीन राज्यांची निर्मिती, एखाद्या राज्यांच्या भौगोलिक क्षेत्रात घट अथवा वाढ करणे; राज्यांच्या सीमेत, नावात बदल करणे हे बहुमताने ठराव संमत करून करू शकते. पण प्रत्यक्षात नवीन राज्य निर्मितीच्या प्रक्रियेत अनेक पर्याय असू शकतात. त्यातला पहिला असा की विद्यमान राज्यातील एखादा व काही भूभाग अथवा भूप्रदेश वेगळा करून त्याला स्वतंत्र व नवीन राज्याचा दर्जा देणे. दुसरा पर्याय म्हणजे दोन किंवा दोनापेक्षा अधिक राज्यांचे एकत्रीकरण घडवून आणणे अथवा दोन वा त्यापेक्षा अधिक राज्यांमधील काही प्रदेश एकत्रित करून त्या नवीन भूभागाला वेगळे राज्य संबोधणे. तिसरा पर्याय म्हणजे दोन वा अधिक राज्यांमधील काही प्रदेश एकत्रित करून त्याला नवीन राज्य म्हणून दर्जा देणे. अशा प्रकारचा कोणताही बदल करतांना संबंधित राज्यांशी विचारविनिमय करणे संसदेवर बंधनकारक असते.

राज्य निर्मितीच्या प्रक्रियेत प्रथम राष्ट्रपतींची पूर्वसंमती घेऊन केंद्रीय मंत्रीमंडळ राज्य निर्मितीचा मसुदा तयार करते आणि राष्ट्रपतींकडे पाठविते. राष्ट्रपती हा मसुदा संबंधित राज्याकडे मत-मतांतरे घेण्यासाठी पाठवितात. हा मसुदा राज्याने किती अवधीत द्यावा हे राष्ट्रपतीच ठरवितात. संबंधित राज्याचे राज्यनिर्मितीचे मत केंद्र सरकार स्वीकारू किंवा नाकारू शकते. तसेच संबंधित राज्याने राज्यनिर्मिती बाबतचे मत वारंवार देण्याची आवश्यकता नाही. राज्यनिर्मितीबाबत राज्याला फक्त मत व्यक्त करता येते. राज्य शासनाला कोणताही अधिकार नाही. याबाबतीत संविधानाने संसदेला सर्वोच्च अधिकार दिलेले आहेत. संसद राज्य सरकारच्या अनुमतीशिवाय राज्यनिर्मितीचे पाऊल उचलू शकते. त्याशिवाय संसद भारतीय राज्याची पुनर्रचना करू शकते. संविधान प्रादेशिक एकता अथवा राज्याच्या अस्तित्वाची हमी देऊ शकत नाही. त्यामुळेच भारताला 'विभक्त राज्याचे अविभाज्य संघ' म्हणतात. संघ सरकार राज्य सरकारला समाप्त करू शकते. याच संदर्भात अमेरिकन संघराज्याकडे पाहिल्यास असे दिसते की अमेरिकेत संविधानाद्वारे प्रादेशिक एकता अथवा राज्यांच्या अस्तित्वाची हमी आहे. अमेरिकन संघ सरकार नवीन राज्याची निर्मिती अथवा त्याच्या सीमेत बदल हा संबंधित राज्याच्या संमतीशिवाय करू शकत नाही. त्यामुळेच अमेरिकन संघराज्याला 'अविभाज्य राज्याचा अविभाज्य संघ' असे म्हणतात. संसद अनुच्छेद- २ नुसार नवीन प्रदेश किंवा नवीन राज्याची निर्मिती करणे अथवा रद्द करणे, अनुच्छेद- ३ नुसार नवीन राज्य निर्माण करणे, अस्तित्वात असलेल्या राज्याचे क्षेत्रफळ, सीमा, सीमारेषा आणि नाव बदलणे या अधिकारात ३६८ व्या कलमानुसार घटनादुरूस्ती करता येत नाही.

अर्थात राज्य निर्माण करण्याचा कायदा हा साधारण कायदेशीर प्रक्रियेद्वारे

साध्या बहुमताने करता येतो. केंद्र सरकारने भारत-पाकिस्तान करारनाम्यानुसार १९५८ ला बेरुबारी संघ (पश्चिम बंगाल) पाकिस्तानला देऊन टाकला. यावेळी असा प्रश्न उपस्थित झाला की संसदेला असा अधिकार आहे का? भारताचा एखादा भूप्रदेश अन्य देशाला देता येतो. या बाबतीत बेरुबारी संघ आणि पश्चिम बंगाल या विवादात सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले की संसदेला राज्याची सीमा समाप्त करून भारताचा भूप्रदेश अन्य देशाला देता येत नाही. संसदेला हे कार्य अनुच्छेद ३६८ नुसार संविधानात घटनादुरुस्ती करून करता येते. अशाप्रकारे ९ वे संविधान संशोधन अधिनियम (१९६०) नुसार बेरुबारी संघ (पश्चिम बंगाल) पाकिस्तानाला देण्यात आला. १९६९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की भारत आणि अन्य देशामधील सीमा निर्मिती वाद विवाद सोडविण्यासाठी संविधान संशोधन करण्याची आवश्यकता नाही. हे कार्य पालिकेद्वारे करता येते. यात भारतीय प्रदेशाला विदेशाकडे सोपविता येत नाही. हा मुद्दा यात समाविष्ट होत नाही.

राज्याचे मतप्रदर्शन आल्यानंतर राष्ट्रपती ते मंत्रीमंडळाकडे पाठवितात. मंत्रीमंडळ चर्चेसाठी, संमतीसाठी संसदेकडे पाठविते. संसदेत राज्य निर्मितीच्या मसुद्यावर २/३ बहुमताने ठराव संमत केल्यास राज्य निर्मितीचा ठराव संमत होतो.

## आघाड्यांच्या राजकारणात राज्य निर्मितीचा प्रश्न :

पहिला राज्य पुनर्रचना आयोग आला तेव्हा केंद्रात काँग्रेस पक्षाचे बहुमताचे सरकार होते म्हणून ते संमत झाले. सध्या आघाडी सरकारे केंद्रात आणि राज्यात आल्याने नवीन राज्यनिर्मितीचा मुद्दा अधिक गुंतागुंतीचा बनलेला आहे. छोट्या राज्यांच्या मुद्द्यावर पक्षांत मतभेद आहेत. भाजपने याचे समर्थन केलेले आहे. तर काँग्रेसने सुरुवातीपासूनच छोट्या राज्याला विरोध केलेला आहे. जसे नेहरूंनी विदर्भ राज्याला त्यावेळी केलेला विरोध, तर इंदिरा गांधींनी तेलगणा निर्मितीला विरोध करून समतोल विकास करण्याचे सूचित केलेले होते. काँग्रेसने तेलंगणाच्या बाबतीत स्पष्ट भूमिका घेतलेली होती. काँग्रेसला वाटते की छोटी राज्ये निर्माण झाली म्हणजे आपली त्या राज्यातील ताकद कमी होईल आणि त्या प्रांतातील प्रादेशिक पक्षाचे प्रभुत्व, नेत्यांचे वर्चस्व वाढेल आणि काँग्रेस अल्पमतात येईल. यात सत्यताही आहे. समजा, तेलंगणा राज्य झाले तर तेलंगणा राष्ट्र समिती आणि त्याचे नेते चंद्रशेखर रावांचे वर्चस्व वाढण्याची दाट शक्यता आहे आणि तसेच झाले. छोट्या राज्य निर्मितीचा प्रश्न हा संसदेच्या बहुमतावर अवलंबून असला तरी संसदेत आघाड्यांच्या शासनामुळे संमत होण्याचा गुंतागुंतीचा प्रश्न निर्माण होतो. त्यात पक्षांचे, नेत्यांचे हितसंबंध महत्त्वाचे बनू शकतात. तसेच ज्या राज्यातून या मागण्या येतात त्या

राज्यात सुद्धा एकमत असते असे नाही. जसे तेलंगणा, विदर्भाचे राज्य यांना स्थानिक पक्षांचा प्रचंड विरोध आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात छोटे राज्य निर्माण करणे हे जिकिरीचे काम होणार आहे. केंद्रात युपीए-२ चे सरकार असताना त्यांनी छोटे राज्य निर्माण करण्याला विरोध केला होता.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका :

डॉ. आंबेडकर प्रकृती अस्वास्थ्यामुळे राज्य पुनर्रचना आयोगासमोर साक्ष देऊ शकले नाहीत. १९५५ मध्ये लिहिलेल्या 'भाषावार प्रांतरचना' या पुस्तिकेत त्यांनी प्रा. पणीकरांच्या भूमिकेला अनुमोदनच दिलेले होते. 'एक राज्य, एक भाषा' या तत्त्वानुसार भौगोलिकदृष्ट्या मोठ्या राज्यांचे प्रशासनाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने आकाराने लहान राज्यांमध्ये विभाजन करण्यात यावे अशी त्यांची भूमिका होती. जगातल्या बहुसंख्य राष्ट्रांनी या तत्त्वाचा स्वीकार केलेला होता. त्यात जर्मनी, फ्रान्स, इटली या देशांमध्ये जेथे 'एक राज्य, एक भाषा' हे तत्त्व नाकारले गेले तेथे ते राष्ट्र धोक्यात आल्याशिवाय राहिले नाही. ऑस्ट्रिया आणि तुर्कस्तान ही प्रभावशाली साम्राज्ये केवळ बहुभाषिक असल्यामुळे मोडकळीस आली होती. सुलभ प्रशासकीय व्यवस्थापनाच्या दृष्टीने आंबेडकरांचे विचार त्यावेळेस अंमलात आणणे सोपे गेले असते. कारण त्यावेळी एकपक्षीय राजवट आणि नेहरूंचे एकछत्री नेतृत्व असल्याने एका भाषेची दोन वा अनेक राज्ये करणे सोपे गेले असते. जर ते केले असते तर एका भाषेची दोन तीन राज्ये निर्माण करून स्वतंत्र राज्यात राहण्याची सवय लागली असती. संसदीय लोकशाहीला पोषक प्रशिक्षणासाठी व राजकीय सामाजीकरणासाठी त्यावेळी अशी छोटी राज्ये आवश्यक होती. आज मात्र प्रशिक्षणासाठी, राजकीय सामाजीकरणासाठी छोट्या राज्यांची आवश्यकता नाही कारण स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राजकीय सामाजीकरण होते. त्यावेळीसुद्धा मराठी भाषिकांचा स्वतंत्र विदर्भ राज्याला विरोध होताच हे नाकारता येत नसले तरी त्यावेळेस जर ते झाले असते तर प्रांतीय राजकारणाची एक वेगळी संस्कृती निर्माण झाली असती.

अर्थात यामुळे भाषावादाला खतपाणी मिळाले नसते. पण त्यावेळी एक अडचण होती. छोटी- छोटी राज्ये निर्माण करण्यासाठी प्रशासनासाठी लागणारा खर्च कसा करायचा? त्यावेळी देशासमोर फाळणीनंतर विस्कटलेली अर्थव्यवस्था, प्रशासन व्यवस्था, निर्वासितांचे प्रश्न, पाकिस्तानबरोबर असलेली युद्धजन्य परिस्थिती यामुळे नेहरूंनी भाषावार प्रांतरचनेकडे दुर्लक्ष करून ते टाळण्याचे, लांबणीवर टाकण्याचे वारंवार सूचित केले होते. त्यामुळे आंबेडकरांच्या मताकडे दुर्लक्ष झाले. त्यावेळेस 'एक राज्य, एक भाषा' असे झाले असते तर भारतात लोकशाहीला पोषक प्रांतीय-

राजकीय संस्कृती निर्माण झाली असती.

डॉ. आंबेडकरांच्या मते एकभाषिक मोठे राज्य निर्माण केल्याने भविष्यात भाषावाद वाढून एकात्मतेचा धोका निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. तर बहुभाषिक राज्यांत नेतृत्वासाठी गटबाजी आणि राजकारभारातील भेदनीती या गोष्टी आढळतात. द्वैभाषिक मुंबई राज्याची काय अवस्था झाली हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहिलेलेच आहे. तमिळ लोक आंध्र प्रदेशीयांचे लोक किंवा आंध्र तमिळांचा द्वेष करतात. आंध्रवाले महाराष्ट्राचा तर महाराष्ट्रवाले आंध्राचा द्वेष करतात. गुजराती मराठी भाषिकांचा तर मराठी भाषिक गुजरातचा. याचे सोपे कारण म्हणजे या दोन तऱ्हेच्या लोकांना बळजबरीने एकत्र आणून त्यांना शासन करण्यास भाग पाडले असल्यामुळे परस्परांमध्ये द्वेषाची भावना निर्माण झाली होती. 'एक राज्य, एक भाषा' या तत्त्वानुसार राज्यरचना झालीच तर जातीय वैमनस्य व सांस्कृतिक संघर्ष यांसारखे राष्ट्रीय एकात्मतेला तडा देणारे वाद निर्माण होणार नाहीत. आंबेडकरांच्या मते राज्य पुनर्रचना आयोगाने उत्तर विरुद्ध दक्षिण भारत ही नवीन समस्या निर्माण केलेली आहे. दक्षिण भारताचे एक भाषिक छोटी छोटी राज्ये निर्माण करून दक्षिण भारताचे विलगीकरण केले तर उत्तर भारताचे एकभाषिक उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार ही राज्ये मोठी ठेवली. अर्थात उत्तर भारताचे एकत्रीकरण केले यामुळे भविष्यात संसदीय राजकारणावर उत्तरेकडील लोकांचे वर्चस्व राहणार होते आणि ते राहिलेच. आंबेडकरांच्या म्हणण्याची प्रचिती आपणाला घटना परिषदेमध्ये राष्ट्रभाषा म्हणून हिंदीला प्राधान्य देताना आली. घटना परिषदेमध्ये मतदान झाले त्यावेळीसुद्धा हिंदी भाषेला विरोध झाला होता. मतदान ७८ विरुद्ध ७८ असे पडले होते. नंतर परत मतदान घेतले त्यावेळी ७७ विरुद्ध ७८ असे झाले होते. त्यामुळे भाषेबाबत उत्तर विरुद्ध दक्षिणेची अटीतटीची टक्कर होती. यावर आंबेडकरांनी पर्याय काढला. एकभाषिक मोठ्या राज्यांचे विभाजन करून लहान लहान राज्ये करण्याचे सूचित केले. त्यानुसार त्यांनी एकट्या उत्तर प्रदेशाचे पश्चिम उत्तर प्रदेश, मध्य उत्तर प्रदेश आणि पूर्व उत्तर प्रदेश अशी तीन राज्ये निर्माण करून त्यांच्या राजधान्या अनुक्रमे मीरत, कानपूर व अलाहाबाद करण्यात याव्यात, तर बिहारचे उत्तर बिहार व दक्षिण बिहार अशी दोन राज्ये निर्माण करून त्यांच्या राजधान्या पटणा व रांची करण्यात याव्यात. मध्यप्रदेशातून उत्तर मध्यप्रदेश आणि दक्षिण मध्यप्रदेश अशी दोन राज्ये निर्माण करण्यात यावीत. महाराष्ट्राचे पश्चिम, मध्य आणि पूर्व महाराष्ट्र अशी तीन राज्ये वेगळी करावीत तसेच मुंबईचे एक स्वतंत्र राज्य करावे असे त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकरांनी तेव्हा मांडलेले विचार आपण २००० मध्ये बिहारमधून- झारखंड, मध्यप्रदेशातून छत्तीसगड आणि उत्तर प्रदेशातून उत्तराखंड निर्माण करून पूर्ण केले

आहे. हेच जर त्यावेळेस झाले असते तर उत्तर प्रदेशात समतोल विकास झाला असता.

मोठे राज्य ठेवल्याने काही भाग मागास राहिलेले आहेत. उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश मोठी राज्ये असल्याने शासनाच्या योजना दुर्गम, पहाडी भागातील जनतेपर्यंत जाऊन पोहोचण्यास अडचणी आल्या. त्यामुळे आज या तिन्ही राज्यात औद्योगीकरण नाही, पायाभूत सुविधा नाहीत, रोजगारांच्या संधी नाहीत. आज त्या राज्यांची जी दुर्दशा आहे ती राहिली नसती. मायावतींनी उत्तर प्रदेशातून चार राज्यांची मागणी केली असली तरी आजच्या परिस्थितीत दोन राज्ये करणे आवश्यक आहे. चार राज्ये करणे विभिन्न कारणाने हानिकारक ठरू शकते.

आजच्या परिस्थितीत छोटे राज्य निर्माण करणे अडचणीचे आहे. त्यात पहिला मुद्दा असा की छोटी राज्ये निर्माण करून त्याची पुनर्रचना करणे, सीमा निश्चित करणे हे गुंतागुंतीचे ठरू शकते. त्यामुळे आंतरराज्यीय तंट्यात वाढ होते. दुसरा मुद्दा असा की अशी छोटी राज्ये निर्माण केल्याने लोकांच्या स्थितीत सुधारणा होणार नाही अथवा विकासही होणार नाही. मुळात विकास करण्यासाठी छोट्या राज्यांची आवश्यकता नाही तर नेत्यांची मानसिकता, शासकीय अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन, निवडणुकीत योग्य उमेदवाराला निवडून देणे, विरोधी पक्षांची जागरूकता, धर्मनिरपेक्षवादी राजकारण आणि मीडियांची निःपक्षपाती भूमिका यांवर अवलंबून आहे. अशी छोटी राज्ये निर्माण केल्याने राजकीय नेत्यांचे राजकीय स्वार्थ मात्र पूर्ण होऊ शकतात. मुख्यमंत्री, राज्यपाल, मंत्री या पदांची संख्या वाढते. प्रशासकीय यंत्रणा उभी राहते. तिसरा मुद्दा असा की, छोटी राज्ये निर्माण केली तर त्या राज्याची पुनर्रचना, प्रशासकीय यंत्रणेची उभारणी करणे आणि कायदा व सुव्यवस्थेसाठी भरपूर पैसा लागतो. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या पायाभूत सुविधांच्या विकासाकडे दुर्लक्ष होऊन सुधारणा लांबणीवर पडते. तसेच त्या त्या राज्याची आर्थिक शक्ती ही त्या राज्यांतील नैसर्गिक साधनसंपत्ती, औद्योगिक उत्पादन यावर अवलंबून आहे. दुर्बल राज्यांना केंद्राच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे केंद्रसत्ता प्रबळ होते. तसेच सध्याच्या आघाड्यांच्या राजकारणात केंद्राकडून कसा न्याय मिळेल हाही एक प्रश्न निर्माण होतो. अशी आर्थिकदृष्ट्या कमजोर राज्ये विकासकामे तीव्रगतीने करू शकत नाहीत. चौथा मुद्दा असा की छोट्या राज्यांमुळे राजकीय अस्थिरता निर्माण होऊ शकते. सध्याच्या पक्ष पद्धतीच्या स्वरूपामुळे राष्ट्रीय आणि राज्याच्या राजकारणात आघाड्यांची सरकारे आलेली आहेत. आघाडी सरकारच्या अनेक मर्यादा असतात. त्यामध्ये राहून विकासकामे करणे मोठे मुश्कील आहे. कारण प्रत्येक धोरण वा निर्णय घेताना संवादाच्या मार्गाने घेणे त्यावरचे मतभेद लक्षात घेता अवघड

जाते त्यामुळे विकासकामाला गती मिळत नाही. जर आघाडी बिघडली तर मग राजकीय अस्थिरता निर्माण होते. उदा : गोव्यात १९९० ते २००५ पर्यंतच्या १५ वर्षाच्या काळात १४ वेळा सत्तांतर झालेले आहे. सध्या मात्र भाजपाचे पहिल्यांदा बहुमताचे सरकार आहे. झारखंडामध्येही आतापर्यंत १० वेळा सत्तांतर झालेले आहे. तसेच ईशान्येकडील राज्येही अस्थिरतेने ग्रासलेली आहेत. पाचवा मुद्दा असा की छोट्या राज्यांत स्थानिक बहुसंख्याक, प्रभुत्वशाली जाती, हितसंबंधी गट आणि धर्माचा राजकारणात प्रभाव पडून राजकारण अशा जातीगटांच्या हिताभोवती फिरताना दिसते. त्यांचाच प्रभाव राजकारणात, उद्योगात दिसतो. अशा राज्यांत अल्पसंख्याकांच्या हिताकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. सहावा मुद्दा असा की मागास भूभागांसाठी जी संविधानात्मक व्यवस्था केलेली आहे त्यात वैधानिक विकास मंडळे, विकासाचे विशेष निधीचे पॅकेज, प्रादेशिक मंडळेही म्हणावी तेवढी यशस्वी झालेली नाहीत. कारण पक्षीय स्वार्थी हितसंबंधाच्या राजकारणामुळे या योजना कोलमडल्या आहेत. त्यात हजारो कोटींचा वाढता अपव्यय, भ्रष्टाचाराची वाढती प्रकरणे, यामुळे सरकारचा विकास निधी नेते, कंत्राटदार आणि कर्मचाऱ्यांच्या खिशात जात आहे. जनतेचा विकास नावालाच राहतो. बुंदेलखंडाचा ७.२६६ कोटी रुपयाचा निधी नेते- कंत्राटदारांच्या खिशात गेलेला आहे. विकासासाठी प्रबळ इच्छाशक्ती, नियोजनपूर्वक विकास योजना आखणे, वाढत्या भ्रष्टाचाराला अटकाव करणे आवश्यक आहे. स्वतंत्र राज्य मागणे हा एकमेव पर्याय होऊ शकत नाही.

छोटी राज्ये निर्माण केली तर अस्मितांचे राजकारण वाढू शकते. ही राजकारण्यांच्या आकांक्षांची केंद्रे बनतात. असे विभाजन अनेक नव्या वादाला जन्म देऊ शकते. त्यामुळे नवे राज्य निर्माण करण्यापेक्षा स्थानिक स्तरावर पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे आहे. त्याबरोबरच वैधानिक विकास मंडळाच्या अंमलबजावणीतील त्रुटी कमी करून ते मजबूत करणे, विशेष आर्थिक तरतूद करणे, कार्यक्षमता कशी वाढवता येईल, भ्रष्टाचार कसा कमी करता येईल व विकास योजनांना तीव्र गती कशी मिळेल हे पाहिले पाहिजे. तसेच स्थानिक समस्या व गरजांनुसार प्रशासकीय यंत्रणा लवचीक करणे गरजेचे आहे. असे झाले तर विकासासाठी स्वतंत्र राज्याची गरज भासणार नाही.

**संदर्भ सूची :**

१) प्रा. माधव चोले, मे -२०१२, छोट्या राज्य निर्मितीचे वाढते बहुआयामी पेच, नवभारत, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई, संचलित मासिक पृ. २९

२) अर्थबोध पत्रिका, खंड ९ वा, अंक- ७, ऑक्टोबर २०१०, पृ. ७, ९

३) एम. लक्ष्मीकांत, २०११, भारत की राज्यव्यवस्था, राज्यों की पुनर्गठण संबंधी संसद की शक्ती, टाटा मॅक्ग्रा हिल एज्युकेशन प्रा. लि., नवी दिल्ली, पृ. ५.२, ५.३
४) B. R. Ambedkar, 1953, Thoughts of Linguistic States, Page. No. 10, 12, 22, 23, 34, 34, 39
५) बिपीनचंद्र, जुलै २००४, इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स, के. सागर प्रकाशन, पुणे, पृ. १५६, १५७
६) अभिषेक देवराव चव्हाण, डिसेंबर २०१०, ईशान्य भारतातील फुटीरतेच्या चळवळीचे अध्ययन, योजना विशेषांक, मुंबई, पृ. ६२, ६३
७) जे. बी. भट्टाचार्य, २० ऑगस्ट २०११, ईशान्य भारतातील बंडखोरी (मूळ कारणांचा शोध) शोध यात्रा : ईशान्य भारतातील, साधना, पुणे, पृ. ११, २४, २६
८) Amit Prakash, 2009- Jan- December, Brief Note for the Seminar is there a case for Reorganisation of states?, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune
९) Anupama Saxena, 2009- Jan- December, The statutory development Boards in Maharashtra-A Reparaisal, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune
१०) Guatam Pingale, Jan- December 2009, The Telangana Tragedy-A Lesson in integration and Disintegration,Vol-XXI, Journal of Indian school of Political Economy, Pune
११) K. Jayshankar, Telangana Movement, the Demand for A separate State : A Historical Perspective
१२) Louise Tillin, May 14, 2011, Statehold and the Politics of Intent, VDLXLVI No.20 EPW
१३) Nilkanth Rath, Jan-Dec.2009, Speration is no solution to the problem of regional imbalance in Development, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune
१४) Prakash Ambedkar, Jan- Dec. 2009, On Small States, Vol-XXI, Journal of Indian school of Political Economy, Pune
१५) P. R. Panchmukhi, Jan- Dec. 2009, Regional Justice Perspectives and the issue of states re recognisation, in India : A Revist, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune
१६) R. P. Kurulkar, Jan- Dec.2009, The Problem of Regional Disparities in Maharashtra state and the Role of the Regional

Development Boards, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune
१७) R. L. Pitale, Jan- Dec.2009, Why Vidarbha State? Failure of article 371 (2) of the Constitution : Vidarbha state is the only alternative, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune
१८) Suhas Palshikar, Jan-Dec.2009, Formation of States/ Reorganisation of States, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune
१९) Sandeep Shastri, Jan- Dec. 2009, Formation of New State : Federalising the process Institutionalising the mechanisms, Vol-XXI, Journal of Indian School of Political Economy, Pune
२०) Yogendra Yadav, Jan-Dec.2009, On thinking about scale of Representative Government in India, Vol-XXI, Journal of Indian school of Political Economy, Pune
२१) अभय टिळक, मार्च २०११, अर्थबोधपत्रिका, खंड ९ वा, अंक १२ वा, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, सेनापती बापट रोड, पुणे
२२) अभय टिळक, जाने. २०११, अर्थबोधपत्रिका, खंड ९ वा, अंक १० वा, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, सेनापती बापट रोड, पुणे
२३) अभय टिळक, डिसें. २०१०, अर्थबोधपत्रिका, खंड ९ वा, अंक ९ वा, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, सेनापती बापट रोड, पुणे
२४) अशोक चौसाळकर, फेब्रु. २०१०, तेलंगणाचा तिढा, प्रबोधन प्रकाशन ज्योती, कोल्हापूर
२५) ओपन हाऊस, २७ नोव्हें. २०११, छोट्या राज्यांचा मोठा पेच, रविवार महाराष्ट्र टाईम्स, मुंबई
२६) उदय नारकर, फेब्रु. २०१०, स्वतंत्र तेलंगणा चळवळ : ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्रबोधन प्रकाशन ज्योती, कोल्हापूर
२७) के. सी. सुरी, संक्षेप व अनुवाद : मनोहर सोनवणे, जाने- मार्च २००४, लोकानुरंजनवादाकडून व्यवहारवादाकडे : आंध्रप्रदेश १९८३ ते २००३, अंक १६६, समाज प्रबोधन पत्रिका
२८) धनंजय कुलकर्णी, २०१०, तेलंगणा अहवालामुळे गुंताच वाढला, महाराष्ट्र टाईम्स, मुंबई
२९) नरेंद्र दाभोलकर, (संपा.) १४ व २१ ऑक्टोबर २०१०, विदर्भाला सुखी करा, वर्ष ६३/अंक १९२, साधना साप्ताहिक, सदाशिव पेठ, पुणे

***